पोलीस ठाणे सिल्लोड (शहर) जि. छत्रपती संभाजीनगर

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण  **P.S.(ठाणे):** सिल्लोड सिटी
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0033  **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/02/2024 08:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ३५३ |
| 4 | भारतीय दंड संहिता १८६० | ३३२ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 26/02/2024
      **Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2024
      **Time From (वेळेपासून):** 18:52 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 18:52 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 27/02/2024  **Time (वेळ):** 08:01 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 005
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/02/2024 08:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 03 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** सिल्लोड ते कन्नड रोड,सिल्लोड

   (c)**In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शंकर महादेव मुटेकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ACB जालना,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ACB जालना,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल साहेबसींग सुलाने | | | 1. डोनगाव ता गंगापुर,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 2 | विठ्ठल त्र्यबक राठोड | | | 1. आधारवाडी,सिल्लोड,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |
| 3 | राहुल बबन खैरे | | | 1. टिळकनगर,सिल्लोड,सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अ,पा लागलेले 15000/ रोख रक्कम | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी शंकर महादेव मुटेकर , वय – 39 वर्ष, व्यवसाय – नोकरी, पोलीस निरिक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना, मोबाईल नंबर 9767108455.

समक्ष सिल्लोड शहर पोलीस स्टेशन येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे पोलीस निरिक्षक या पदावरती नियुक्त आहे. दिनांक 20.02.2024 रोजी लाचलुपत प्रतिबंधक विभाग जालना येथे हजर असताना तक्रारदार नामे संदिप भानुदास काकडे वय – 35 वर्ष व्यवसाय – वाळु वाहतुक व शेती रा. काकडेवाडी, धानोरा ता. सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांची तक्रार दिली ती की,
समक्ष अॅन्टीकरप्शन ब्युरो जालना येथे मित्र परमेश्वर दुधे याचे सोबत येवुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहण्यास आहे. माझी मौजे केराळा शिवारात गट नं. 468 मध्ये दिड एकर शेती आहे. तसेच माझ्याकडे माझे मालकीचा ट्रॅक्टर क्रमांक - MH- 20-EJ-6145 हा असुन त्याव्दारे मी पुर्णा नदीमधुन वाळु वाहतुक करतो. दिनांक 13.02.2024 रोजी मी माझा मित्र परमेश्वर दुधे याचे कडुन त्याचे मालकीचा ट्रॅक्टर क्रमांक MH-20-EJ-6242 व ट्रॉली सहा महीने चालविण्यासाठी भाडेतत्वावरती घेतली असुन त्याबाबत मी परमेश्वर दुधे याचे सोबत शंभर रुपयाचे बॉण्ड पेपर वरती करारनामा केला असुन त्याची नोटरी करण्यातआली आहे.
दिनांक13.02.2024 रोजी माझा वाळु वाहतुकीचा ट्रॅक्टर क्रमांक- MH- 20-EJ-6145 हा एस.डी.एम कार्यालय सिल्लोड येथील श्री. रशिद उर्फ सईद शेख यांनी पकडुन तहसिल कार्यालय सिल्लोड येथे लावला होता. मी गावातील विहीरीवरती बांधकाम करण्यासाठी वाळु टाकत असल्याने व माझा वाळु वाहतुकीचा ट्रॅक्टर तहसिल कार्यालय सिल्लोड येथे लावला असल्याने मला गावातील विहरीवरती वाळु टाकणेअसल्याने मी माझा मित्र परमेश्वर दुधे याचे कडुन त्याचे मालकीचा ट्रॅक्टर क्रमांक MH-20-EJ-6242 व ट्रॉली सहा महीने चालविण्यासाठी भाडेतत्वावरती घेवुन त्याबाबत मी परमेश्वर दुधे याचे सोबत शंभर रुपयाचे बॉण्ड पेपरवरती करारनामा करुन त्याबाबत नोटरी केलेली आहे..
दिनांक 13.02.2024 रोजी दुपारी 04.00 वाजता मी एस.डी.एम कार्यालय सिल्लोड येथे जावुन श्री. रशिद उर्फ सईद शेख साहेब यांना भेटलो व त्यांना म्हणालो की, मी गावातील विहरीवरती वाळु टाकण्याचे काम करत आहे. माझा ट्रॅक्टर वरती कारवाई करुन तो तहसिल कार्यालय येथे लावला आहे. मी माझ्या मित्राचा ट्रॅक्टर क्रमांक MH-20-EJ-6242 हा वाळु वाहतुक करण्यासाठी भाडे तत्वावरती घेतला आहे. त्यावेळी मला श्री. रशिद शेख साहेब यांनी तुला मला वाळुच्या ट्रॅक्टरचा हप्ता दयावा लागेल असे सांगीतले. त्यानंतर मी माझा वाळु चा ट्रॅक्टर लावलेल्या ठिकाणी तहसिल कार्यालय सिल्लोड येथे आलो. त्या ठिकाणी मला तलाठी राहुल सुलाणे साहेब भेटले. त्यावेळी त्यांना मी गावातील विहरीवरती बांधकामासाठी वाळु टाकण्याचे काम घेतले आहे. माझा ट्रॅक्टर तहसिलला लागल्यामुळे मी मित्राचा ट्रॅक्टर भाडे तत्वावरती घेतला आहे त्याव्दारे मी वाळु टाकण्याचे काम करणार आहे असे म्हणालो.त्यावेळी तलाठी सुलाणे साहेब मला म्हणाले की,तुला वाळु वरती ट्रॅक्टर चालवायचा असेल तर मला 15,000/- रुपये हप्ता दयावा लागेल. तु जर मला वाळुच्या ट्रॅक्टर चा हप्ता दिला नाही तर तुझा ट्रॅक्टर पकडुन तहसिलला लावला जाईल असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना सध्या माझ्याकडे पैसे नाहीतअसे म्हणालो व त्यांचे पासुन घरी निघुन गेलो.

दिनांक 15.02.2024 रोजी श्री.रशिद उर्फ सईद शेख ( मामु ) यांनी त्यांचे मोबाईल वरुन मला फोन करुन एस.डी.एम कार्यालय सिल्लोड येथे बोलविले होते. तसेच दिनांक 16.02.2024 रोजी रात्रौ 7.30 वा ते 8.00 वा चे दरम्यान मला तलाठी सुलाने साहेब यांनी हॉट्सअप कॉल करुन तुझ्या वाळुच्या ट्रॅक्टरच्या हप्त्याचे 15,000/- रुपये घेवुन मंगळवार दिनांक 20.02.2024 रोजी सिल्लोड येथे ये असे सांगीतले आहे. माझे मध्ये व तलाठी राहुल सुलाणे, श्री रशिद उर्फ सईद शेख ( मामु ) यांच्या मध्ये पैशाबाबत कोणत्याही प्रकारचा उसनवारीचा व्यवहार झालेला नाही. तसेच त्यांच्या मध्ये व माझ्यामध्ये कोणत्या ही प्रकारचा वादविवाद झालेला नाही.

तरी आज दिनांक 20.02.2024 रोजी मला एस.डी.एम. कार्यालय सिल्लोड येथील श्री.रशिद उर्फ सईद शेख ( मामु ) यांनी एस डी एम कार्यालय सिल्लोड येथे भेटण्यासाठी बोलविले आहे. तसेच तलाठी राहुल सुलाणे यांनी माझे वाळुच्या ट्रॅक्टरचा हप्ता घेवुन सिल्लोड येथे बोलविले आहे. आज रोजी मी त्यांना भेटणार आहे. तसेच माझे वाळुच्या ट्रॅक्टर बाबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी मला वाळुचे ट्रॅक्टरच्या हप्त्याबाबत त्यांनी स्वता अथवा इतरामार्फत पैशाची मागणी केल्यास त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करण्यात यावी म्हणुन त्यांचे विरध्द माझी तक्रार आहे.

अशा प्रकारची लेखी तक्रार दिली. सदर सापळा कारवाई करीता मा. सहायक आयुक्त वस्तु व सेवाकर भवन कार्यालय जालना येथे गोपनिय कारवाई करीता पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार केला. त्यावेळी त्यांनी पंच म्हणुन श्री. महेश नंदकिशोर जाधव, राज्यकर निरिक्षक व श्री. विनोद मोहन डोंगरे, कर सहायक वस्तु व सेवाकर भवन, जालना यांना नियुक्त केले. तक्रारदार श्री. काकडे यांनी त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात दिल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा मित्र परमेश्वर दुधे यांच्याकडुन त्यांचे मालकीचा ट्रॅक्टर क्रमांक MH-20-EJ-6242 व ट्रॉली सहा महीने चालविण्यासाठी भाडे तत्वावरती घेतल्या बाबत शंभर रुपयाचे बॉण्ड पेपरवरती करारनामा करुन त्याची नोटरी केली असल्याचे सांगुन सदर नोटरी ची झेरॉक्स प्रत दिली. त्यावरती आम्ही स्वता, तक्रारदार श्री. काकडे व दोन्ही पंचानी सहया केल्या. त्यानंतर आम्ही मोबाईल फोनवरुन पोलिस अधिक्षक साहेब ला.प्र.वि छत्रपती संभाजीनगर यांचे मोबाईलवरती हॉट्सअप कॉल करुन तक्रारदाराने दिलेल्या तक्रारी बाबत माहीती दिली व छत्रपती संभाजीनगर जिल्हयामध्ये गोपनिय कारवाई करता परवानगी मिळणेबाबत पत्रव्यवहार केला असता मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्हयात गोपनिय कारवाई करीता जाणेबाबत परवानगी दिली.

तक्रारदार यांनी दिलेली तक्रार खरी आहे काय व ते लाच मागतात काय याची पडताळणी करुन खात्री करण्यासाठी दिनांक 20.02.2024 रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता श्री.शेख व श्री.सुलाने मिळुन आले नाहीत. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल वरुन तलाठी श्री. सुलाने यांचे मोबाईल नंबर 7719918716 वरती फोन केला असता तलाठी सुलाने यांनी ते बाहेर असल्याचे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार श्री. काकडे यांचे मोबाईल वरती पंचासमक्ष श्री. राहुल खैरे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9552180268 वरुन फोन करुन सुलाने दादाचा फोन आला होता. पैसे दिले का त्याच्याकडं नेउन. त्यावेळी तक्रारदार श्री. काकाडे म्हणाले की, किती देण पडल विचारुन घे. त्यावेळी राहुल खैरे म्हणाला की, पंधरा किलो एक रुपया बी कमी घेणार नाही आजुन ते. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे म्हणाले की, पंधरा हजार लय होते न रे. त्यावेळी राहुल खैरे म्हणाला की, तु काय कर दहा हजार रुपये घेवुन टाक असे फोन वरुन बोलणे झाले. त्यानंतर लाचमागणी पडताळणी स्थगीती पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दिनाक 21.02.2024 रोजी लाचमागणी पडताळणी करण्यासाठी आम्ही सापळा पथक व दोन्ही पंचासोबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथुन सिल्लोड शहराजवळी गोपनिय ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी व्हाईस रेकॉडर सुरु करुन ते तक्रारदार श्री. काकडे यांच्या बनियला बाधुन तक्रारदार श्री. काकडे यांना पंच श्री. जाधव यांचे सोबत श्री.शेख व श्री.सुलाने यांची लाचमागणी बाबत पडताळणी करण्यासाठी पाठविले. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे यांची श्री.शेख व तलाठी श्री.सुलाने यांचे सोबत भेट झाली नाही त्यामुळे तक्रारदार पंचासोबत सुरक्षित ठिकाणी परत आले. तक्रारदार श्री. काकडे सुरक्षित ठिकाणी परत आल्यानंतर पंचासमक्ष तलाठी श्री. सुलाने यांचे मोबाईल क्रमांक 7719918716 वरुन तक्रारदार यांचे मोबाईल नंबर 9588445878 वरती हॉट्सअप कॉल येवुन बंद झाल्याने तक्रारदार श्री. काकडे यांनी त्यांचे मोबाईल वरुन तलाठी श्री. सुलाने यांचे मोबाईल नंबर वरती हॉट्सअप कॉल करुन त्याचा आवाज मोठा करुनन व्हाईस रेकॉर्डर समोर धरुन बोलणे केले. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे म्हणाले की, एकदा भेटुन म्हणल कस हय क्लेअर त ते राहुल काही बोलतो उलट पालट मानसाला. त्यावेळी तलाठी राहुल सुलाने म्हणाले की, आरंपण तु फक्त आर्ध देत होता नं..पुर्णदेण. त्यावेळी तक्रारदार श्री.काकडे म्हणाले की, पुर्ण कीती देउ.. त्याला तुम्ही क्लेअर च केल नाही तो सांगतो काही, तुम्ही म्हणता कसं. त्यावेळी तलाठी राहुल सुलाणे म्हणाले की, काय सांगतो त्यो. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे म्हणाले की, त्यो म्हणतो पंधरा हजार रुपये. त्यावेळी तलाठी राहुल सुलाने म्हणाले की, बरोबर हय. त्यावेळी तक्रारदार

काकडे म्हणाले की, काही कमी जादा करा. त्यावेळी तलाठी राहुल सुलाने म्हणाले नाही नं जे चालु हयते त करा नं तुम्ही. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे म्हणाले की, तरी काहीत काही करा आता..लय परेशानी है. त्यावेळी तलाठी राहुल सुलाने म्हणाले की, काही नाही मी काही नाही करु शकत. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे म्हणाले की, हा पण कीती देउ टाकु मंग फायनल सांगुन दया. त्यावेळी तलाठी राहुल सुलाने म्हणाले की, जे सांगीतलं ते देण. आरं फायनल म्हणजे सगळ्यांचे ते च चालु हय. दुसर काय सांगाव तुला असे बोलणे झाले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद केला.त्यानंतर लाचमागणी पडताळणी स्थगीती पंचनामा करण्यात आला.
त्यानंतर दिनांक 22.02.2024 रोजी लाचमागणी पडताळणी करण्यासाठी आम्ही सापळा पथक व दोन्ही पंचासोबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथुन सिल्लोड शहराजवळी गोपनिय ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी व्हाईस रेकॉडर सुरु करुन ते तक्रारदार श्री. काकडे यांच्या बनियला बाधुन पंच श्री. जाधव यांना तक्रारदार श्री. काकडे यांचे सोबत श्री.शेख, श्री.सुलाने व एस.डी.एम सिल्लोड यांची लाचमागणी बाबत पडताळणी करण्यासाठी पाठविले. त्यावेळी तक्रारदार व पंच मोटर सायकल वरती गोपनिय ठिकाणा वरुन एस. डी. एम कार्यालय सिल्लोड येथे गेले. त्या ठिकाणी गेल्यानंतर तक्रारदार पंचासमक्ष श्री. रशिद उर्फ सईद शेख ( मामु ) यांना भेटले. त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, तुम्ही च करान. त्यावेळी श्री. शेख मामु म्हणाले की, नही जान दो ..जान दो. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे म्हणाले की, नाही.. सायबाला बोलु. त्यावेळी श्री. शेख मामु म्हणाले की ,देशमुख साहेबाला बोला एकदा .. त्यांना म्हणा सायबाला भेटायच हात्यो बरोबर बोलतो. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे म्हणाले की, सायबाला भेटायच सर ते ट्रॅक्टर पकडल होत नं. त्यावेळी देशमुख साहेब म्हणाले की, भेटानं. चिठ्ठी देते भेटुन देते साहेब तिथे नाव लिहुन दयायचं..चिठ्ठीतो माणुस देतो. त्यानंतर तक्रारदार श्री. काकडे हे त्यांचे पकडलेल्या वाळुच्या ट्रॅक्टरचे संदर्भाने एस.डी.एम सिल्लोड यांना भेटले. त्यावेळी एस.डी.एम सिल्लोड यांनी तक्रारदार यांना त्यांचे वाळुच्या ट्रॅक्टर वरती कारवाई झाली असुन त्यांना दंड भरण्यास सांगीतले.त्यानंतर लाचमागणी पडताळणी स्थगीती पंचनामा करण्यात आला.
त्यानंतर आज दिनांक 26.02.2024 रोजी लाचमागणी पडताळणी करण्यासाठी आम्ही सापळा पथक व दोन्ही पंचासोबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथुन सिल्लोड शहराजवळी गोपनिय ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी व्हाईस रेकॉडर सुरु करुन ते तक्रारदार श्री. काकडे यांच्या बनियला बाधुन पंच श्री. जाधव यांना तक्रारदार श्री. काकडे यांचे सोबत श्री.शेख व श्री.सुलाने यांची लाचमागणी बाबत पडताळणी करण्यासाठी पाठविले. त्यावेळी तक्रारदार व पंच मोटर सायकल वरती गोपनिय ठिकाणावरुन एस. डी. एम कार्यालय सिल्लोड येथे गेले. त्या ठिकाणी तक्रारदार यांना श्री. शेख हे भेटले नाहीत. त्याठिकाणी तक्रारदार श्री. काकडे यांना तलाठी श्री. राहुल सुलाने हे श्री. विठ्ठल राठोड यांच्या सोबत भेटले. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे याचेकडे पंचासमक्ष तल

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sheshrao abaji udar(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

पंचासमक्ष तलाठी राहुल सुलाने यांनी पंधरा हजार रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम तलाठी राहुल सुलाने यांचे सोबत असलेल्या श्री. विठ्ठल राठोड यांच्याकडे देण्यास सांगीतली. त्यानंतर तक्रारदार श्री. काकडे व पंच क्रमांक 01 श्री. जाधव हे गोपनिय ठिकाणी परत आले. त्या ठिकाणी दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. काकडे व तलाठी श्री. राहुल सुलाने यांच्या मध्ये व्हाईस रेकॉर्डिंगमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण त्यातील अनावश्यक संभाषण टाळुन ऐकले. त्यावेळी तलाठी श्री. राहुल सुलाने याने तक्रारदार यांना पंधरा हजार रुपये लाचेची रक्कम मागतील्याचे निष्पन्न झाल्याने तक्रारदार श्री. काकडे यांनी त्यांचे कडील स्वकष्टाचे पंधरा हजार रुपये रक्कम लाचेची रक्कम म्हणुन वापरण्यासाठी दिली.

त्यानंतर आम्ही फिर्यादी, दोन्ही पंचांना ऍन्थासिन पावडर बाबत माहीती देवुन सदर नोटांना ऍन्थासिन पावडर लावुन त्याबाबतचे गुणधर्म समजावुन सांगीतले. त्यानंतर ऍन्थ्रासिन पावडर लावलेली पंधरा हजार रुपये लाचेची रक्कम तक्रारदार श्री. काकडे यांचे अंगातील जीन्स पॅन्टचे समोरील बाजुच्या उजव्या खिशात ठेवली. व त्यांना सुचना दिली की, आलोसे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डाव्या हाताने मोबाईलचा टॉर्च लावुन इशारा करण्याबाबत सुचना दिल्या. तसेच आलोसे तलाठी श्री. राहुल सुलाणे हे तहसिल कार्यालय सिल्लोड येथे असल्याबाबत गोपनिय माहीती मिळाल्याने आलोसे श्री.सुलाने यांच्यावरती पाळत ठेवण्यासाठी पोलीस अंमलदार श्री. अतिश उत्तमराव तिडके , बक्कल नंबर 1301, लाप्रवि जालना यांना रवाना करण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशिन सुरु करुन ती एका कापडी पिशवी मध्ये टाकली व ती कापडी पिशवी तक्रारदार श्री. काकडे यांचे शर्टच्या आत कोणालाही दिसणार नाही अशा रितीने बंदाच्या साहयाने बनियनला बांधली व पंच क्रमांक 01 श्री. जाधव यांना तक्रारदार यांचे सोबत श्री. विठ्ठल राठोड यांची भेट घेण्यासाठी सिल्लोड ते कन्नड रोड वरील अग्रवाल सुतगिरणी येथे मोटर सायकल वरती पाठविण्याते आले असता त्या ठिकाणी श्री. विठ्ठल राठोड हे तक्रारदार यांना अग्रवाल सुतगिरणी समोर रोडवरती भेटले. त्यावेळी तक्रारदार श्री. काकडे यांनी त्यांचे अंगातील जीन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम 15,000/- रुपये उजव्या हातानेकाढुन ती आलोसे श्री. विठ्ठल राठोड यांस देण्यासाठी पुढे केली . त्यावेळी आलोसे श्री. विठ्ठल राठोड यांनी सदरची लाचेची रक्कम तक्रारदार श्री. काकडे यांना विठ्ठल जाधव यांनी त्यांचे ताब्यातील टि.व्ही.एस रॅडीऑन कंपनीची मोटर सायकलच्या लेदरच्या बॅग ( डिक्की ) मध्ये ठेवण्यास सांगीतले असता. तक्रारदार श्री. काकडे यांनी त्यांचे उजव्या हाताने आलोसे श्री. विठ्ठल राठोड यांच्या सांगण्यावरुन त्यांचा ताब्यातीलटि.व्ही.एस रॅडीऑन कंपनीची मोटर सायकलच्या लेदरच्या बॅग ( डिक्की ) मध्ये ऍन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम पंधरा हजार रुपये ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरल्या प्रमाणे आलोसे श्री. विठ्ठल राठोड यांनी लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा 18.52 वाजण्याचे सुमारास केला. त्यावेळी आलोसे श्री. विठ्ठल राठोड यांना संशय आल्याने त्यांनी त्यांचे ताब्यातील मोटर सायकल व लाचेच्या रकमेसह पळ काढला. त्यावेळी सापळा पथकाने सरकारी वाहनाचे साहयाने त्यांचा पाठलाग करुन त्यांना तात्काळ पकडुन त्यांचे ताब्यातुन मोटार सायकल सह लाचेची रक्कम पंधरा हजार रुपये हस्तगत करण्यात आली.

त्याच वेळी तहसिल तहसिल कार्यालय सिल्लोड येथे आलोसे श्री. राहुल सुलाने , तलाठी तहसिल कार्यालय सिल्लोड यांच्यावरती पाळत ठेवण्यासाठी नेमलेले पोलीस अंमलदार श्री.अतिश उत्तमराव तिडके , बक्कल नंबर 1301, लाप्रवि जालना यांना सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री. राहुल सुलाने यांना ताब्यात घेण्याबाबतच्या फोन व्दारे सुचना दिल्या. त्यानंतर काही वेळाने पोलीस अंमलदार श्री. अतिश तिडके यांनी फोन व्दारे सांगीतले की, त्यांना दिलेल्या सुचने प्रमाणे ते आलोसे श्री. राहुल सुलाने यांना

ताब्यात घेण्यासाठी त्यांचे कडे गेले व त्यांना स्वताचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथील ओळख पत्र दाखवुन त्यांना मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथील पोलीस अंमलदार असुन आपल्यावरती सापळा कारवाई झालेली असल्याने आपणास पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांनी ताब्यात घेण्यास मला आदेशित केल्याने सापळा पथक या ठिकाणी येईपर्यत आपण माझ्या सोबत थांबा असे सांगीतले होते. परंतु आलोसे श्री. राहुल सुलाने यांनी पोलीस अंमलदार श्री.अतिश तिडके हे त्यांचे शासकीय कर्तव्य करत असताना त्यांचे शासकीय कामात अडथळा निर्माण करुन पोलीस अंमलदार श्री. अतिश तिडके यांना त्यांचे कर्तव्यापासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी धक्काबुक्की मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केलेली आहे. त्यामध्ये पोलीस अंमलदार श्री. अतिश तिडके यांना दुखापत झालेली आहे.

तरी तक्रारदार श्री. संदिप भानुदास काकडे यांनी त्यांचा मित्र परमेश्वर दुधे याचे कडुन त्याचे मालकीचा ट्रॅक्टर क्रमांक MH-20-EJ-6242 व ट्रॉली सहा महीने चालविण्यासाठी भाडे तत्वावरती घेतलीअसता सदर ट्रॅक्टर मधुन वाळुची वाहतुक करण्यासाठी तलाठी श्री. राहुल साहेबसिंग सुलाणे वय 29 वर्ष, तलाठी, तहसिल कार्यालय सिल्लोड, सजा खुल्लोड ता. सिल्लोड यांनी तक्रारदार श्री. काकडे यांना त्यांचा वाळुचा ट्रॅक्टर चालविण्यासाठी 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम श्री. विठ्ठल त्र्यंबक राठोड वय 36 वर्ष, कोतवाल, सजा केळगाव तहसिल कार्यालय सिल्लोड ता.सिल्लोड यांचे हस्ते दिनांक 26.02.2024 रोजी 18.52 वाजण्याचे सुमारास सिल्लोड ते कन्नड रोड वरील अग्रवाल सुतगिरणी येथेत्यांचा ताब्यातीलटि.व्ही.एस रॅडीऑन कंपनीची मोटर सायकलच्या लेदरच्या बॅग ( डिक्की ) मध्ये स्विकारलेली आहे. तसेच श्री. राहुल बबन खैरे रा.सिल्लोड ता. सिल्लोड याने तक्रारदार यास आलोसे तलाठी श्री. राहुल सुलाणे याच्याकडे तक्रारदार यांचा वाळुचा ट्रॅक्टर चालविण्याठी लाचेची रक्कम देण्यासाठी लाचमागणी करुन प्रोत्साहीत केले आहे. तसेच सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री. राहुल सुलाने यांना ताब्यात घेण्यासाठी सापळा पथकातील पोलीस अंमलदार श्री. अतिश तिडके हे गेले असता आलोसे श्री. राहुल सुलाने यांनी पोलीस अंमलदार श्री.अतिश तिडके हे त्यांचे शासकीय कर्तव्य करत असताना त्यांचे शासकीय कामात अडथळा निर्माण करुन पोलीस अंमलदार श्री. अतिश तिडके यांना त्यांचे कर्तव्यापासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी धक्काबुक्की मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केलेली आहे म्हणुन त्यांचे विरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

हीफिर्याद दिली.

( शंकर म.मुटेकर )
पोलीस निरिक्षक, लाप्रवि जालना.

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
**Signature of Officer in-charge,**
**Police Station**
पोलीस स्टेशन सिल्लोड (ग्रा.)
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sheshrao abaji udar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**